## निशाणी क्र.८७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांनी उत्तरवादी क्र.८ कृष्णकुमार भगवान परूळेकर यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत अपीलातील उत्तरवादी क्र.८ हे दि.३०/०१/२०१६ रोजी गोवा मेडीकल कॉलेज हॉस्पीटल बांबोळी येथे मयत झाले. मयत उत्तरवादी क्र.८ यांचे वारस मुदतीत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, अपीलकार हे वयोवृध्द् ८० वर्षाचे असल्याने आणि त्यांचे काही लक्षात राहत नसल्याने त्याबाबत काहीच माहिती त्यांचे वकिलांना कळविली नाही. तसेच उत्तरवादी हे बांबोळी गोवा येथे मयत झाल्याने त्यांचा मृत्यु दाखला त्यांना वेळेत प्राप्त झाला नाही. त्यामुळे उत्तरवादी क्र.८ चे वारस मुदतीत दाखल करणेस त्यांना विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा त्यांच्या निष्काळजीपणा अगर हलगर्जीपणामुळे झालेला नाही. सदर विलंब माफ न झाल्यास अपीलकार यांचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरून येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे झालेला विलंब माफ होवून मिळावा, अशी अपीलाकर यांनी विनंती केली आहे.

३. उत्तरवादी यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. सबब, अर्ज विना म्हणणे चालविणेत येत आहे.

४. अपीलकार व त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचा पुकारा करता गैरहजर. तसेच उत्तरवादी व त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री.जी.जे. गिरकर यांचा पुकारा करता गैरहजर.

५. असलेली वस्तुस्थिती आणि अर्जात नमूद असलेली

कारणे यांचा विचार करता विलंबाबाबत अर्जात दिलेले कारण हे संभाव्य आहे असे वाटते. प्रस्तुतचे अपील धडेवाटपाच्या दाव्याविरूध्द् दाखल करणेत आलेले आहे. अपीलकार यांनी अर्जात नमूद केलेल्या कथनाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामुळे अपीलकार कथन करत असलेले अर्जातील कारण हे संभाव्य आहे असे वाटते. सदरचे अपील हे ७ वर्षे जुने आहे. मा. ना. सर्वोच्च न्यायालय यांनी ५ व १० वर्षे जुनी प्रकरणे तातडीने चालवून निकाली करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे न्यायाच्या हितार्थ अपीलकार यांना मयत उत्तरवादी क्र.८ चे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ केल्यास उत्तरवादी यांचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. परंतु, विलंबामुळे प्रकरण प्रलंबित राहिलेले आहे ही बाबही दुर्लक्षित करता येणार नाही. सबब, मयत उत्तरवादी क्र.८ चे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करणे योग्य वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

## — **आदेश** —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत उत्तरवादी क्र.८ चे वारस दाखल करण्यास झालेला विलंब अपीलकार यांनी रक्कम रूपये ५००/— (रूपये पाचशे मात्र/—) आदेशाच्या तारखेपासून एक आठवडयाच्या आत सरकार भरणा करणेच्या अटीवर क्षमापित करणेत येत आहे.

Digitally signed by Prakash Rajaram Kadam
Date: 2019.12.17 13:27:17 +0530

(पी.आर.कदम)
जिल्हा न्यायाधीश—१
सिंधुदुर्ग —ओरोस

दि.१२/१२/२०१९